# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet : www.dte.org.in


**<u>अधिसूचना</u>**

क्रमांक : १०/एनजीपी/मान्यता/तपासणी/२०१३/२२४
दिनांक : १०.४.२०१३

राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र इ. **पदविका** या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०१३-१४ करीता मंजूर अभ्यासक्रमांच्या मान्यतेस मुदतावाढ, प्रवेशक्षमतेत वाढ-घट, अभ्यासक्रम बंद, नवीन अभ्यासक्रम इ. बाबत दि. १०.४.२०१३ पर्यंत मान्यता देण्यात येणार आहेत. याबाबत सर्व संबंधीत व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात येते की, त्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून प्राप्त होणाऱ्या मान्यतेस अनुसरुन त्यांनी या संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड व्दारे संचालनालयाच्या संकेतस्थळी लॉग-इन करुन संस्थेस परिषदेने मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेतील वाढ-घट व इतर माहिती दि. १२.४.२०१३ पर्यंत अद्ययावत करावी. सदर माहितीच्या आधारे शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ची प्रवेश प्रक्रिया व तद्अनुषंगिक कार्यवाही होणार असल्याने सदर दिनांकानंतर प्राप्त झालेल्या माहितीचा विचार होणार नसल्याने याबाबत संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी व्यक्तीशः लक्ष घालून माहिती अद्यायावत करावी.

येथे असेही सूचित करण्यात येते की, संचालनालयाच्या संकेतस्थळी माहिती अद्यायावत केलेल्या माहितीची छाननी तथा तपासणी सहसंचालक, विभागीय कार्यालये यांचेमार्फत करण्यात येईल. म्हणून संबंधित संस्था प्रमुखांनी त्यांची संचालनालयाच्या संकेतस्थळी भरलेली माहितीच्या अनुषंगाने आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयात त्यांनी दिलेल्या दिनांकांस प्रत्यक्ष उपस्थित राहून उपलब्ध करुन देवून संबंधित कागदपत्रांचा १ संच त्यांचेकडे जमा करण्यात यावा.

**sd/-**
**(डॉ. सुभाष महाजन)**
प्र.संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई

प्रत,

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे

त्यांना कळविण्यात येते की, त्यांच्या कार्यक्षेत्रातील **पदविका** व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांनी अद्ययावत केलेली माहिती व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शासनास उपलब्ध करुन दिलेली माहिती यांची पडताळणी तथा तपासणी करण्यासाठी वेळापत्रक निश्चित करुन दि. १४.४.२०१३ पर्यंत माहितीची तपासणी करण्यात यावी. तसेच तपासणीत काही त्रुटी तथा तफावत आढळल्यास आपण संचालनालयाच्या संकेतस्थळी लॉग-इन करुन माहितीची दूरुस्ती संबंधित संस्थेकडून करुन घ्यावी. सदर माहितीच्या आधारे शैक्षणिक वर्ष २०१३-१४ साठीची शासन मान्यता, प्रवेश प्रक्रिया व तद्अनुषंगिक कार्यवाही होणार असल्याने त्यात काही त्रुटी उद्भवल्यास आपणांस जबाबदार धरण्यांत येईल, याची आपण नोंद घ्यावी.

२. सिस्टीम मॅनेजर, कार्यासन क्रमांक ३, तंत्र शिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई

त्यांना कळविण्यात येते की, सदर अधिसूचना संचालनालयाच्या संकेतस्थळी प्रसिध्द करण्यात यावी.